पुण्य नगरी ■ रविवार, १ फेब्रुवारी २०२६

# भूगोल विषयावर 'जिओ-फेस्ट २०२६' उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद कॉलेजमध्ये 'जिओ फेस्ट २०२६' उत्साहात पार पडले. भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी विद्यार्थी, पालक, संशोधक व प्राध्यापक उपस्थित होते.

पहिल्या दिवशी भूगोल विषयातील सखोल ज्ञानावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली, तर सायंकाळी हौशी खगोल अभ्यासक अनिल गवळी यांचे 'विश्वाचा पसारा' या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर आकाश निरीक्षण कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी शुभम यादव यांच्या



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील 'जिओ फेस्ट २०२६' स्पर्धेतील यशस्वी सहभागींना गौरविताना मान्यवर.

'अवकाश संशोधन व सुदूर संवेदन क्षेत्रातील संधी' या व्याख्यानाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रश्नमंजूषा स्पर्धेतील विजेत्यांचा, पदवी व पदव्युत्तर वर्गातील उच्च श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राचार्य डॉ. संजय थोरात व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. एच. पी. पाटील, कार्यशाळा समन्वयक डॉ. शुभांगी काळे, विभागप्रमुख डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. निशा सुर्वे, डॉ. सिद्धार्थ घोडेराव, डॉ. विठ्ठल पाटील, सागर पवार, आर्या जोशी, वैशाली पालकर, अश्विनी मुरवणे यांनी विशेष सहकार्य केले. डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, फोटोग्राफी विभागप्रमुख रवी सुतार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रतिमा हजारे, धनश्री नांगरे यांनी केले. तांत्रिक साहाय्य नामदेव माने, राम बोंगे यांनी केले.

पुण्य नगरी

रविवार, १ फेब्रुवारी २०२६

# 'विवेकानंद'ची शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धेत बाजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित विवेकानंद कॉलेज येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि गुरुदेव कार्यकर्त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धांच्या विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाने अव्वल स्थान पटकावले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जुना बुधवार पेठ येथे ही विभागीय स्पर्धा पार पडली.

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनी असे, अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम क्रमांक (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा). गुरुदेव कार्यकर्ता गटातील सागर कांबळे - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय क्रमांक (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा) असे यश मिळवले. ज्युनिअर कॉलेज (कनिष्ठ महाविद्यालय) गटात वक्तृत्व स्पर्धा : प्रथम - श्रेया इंदूरकर; द्वितीय - वेदिका मोरे, सुगम गायन स्पर्धा : प्रथम - साई गुंडकल्ले, टॅलेंट सर्च स्पर्धा : प्रथम - श्रावणी सांगळे, चित्रकला : द्वितीय - सायमा गोलंदाज यांनी यश मिळवले. विवेकानंद कॉलेज शाखा समन्वयक प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. कैलास पाटील, डॉ. अस्मिता तपासे, डॉ. समीक्षा फराकटे, डॉ. संजय अंकुशराव, डॉ. सुमय्या इनामदार, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. सतीश उपळावीकर आदींनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी यशस्वी झालेल्यांचे अभिनंदन केले. शाखास्तरीय स्पर्धेसाठी आंतरिक गुणवत्ता हमी कक्ष विभागाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार सचिन धनवडे, सदानंद दुर्गुळे यांचे सहकार्य मिळाले. स्पर्धा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे राज्यस्तरीय स्तरावर आयोजित केली जाते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा ● रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६

# विविध स्पर्धांमध्ये विवेकानंद कॉलेजचे यश

## ● विद्यार्थी व शिक्षकांच्या अंतर्गत स्पर्धा

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धांच्या विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाला अव्वल स्थान पटकावले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये या स्पर्धा झाल्या.

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनींमधे अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम क्रमांक (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा) यात यश संपादन केले. शिक्षक गटातील सागर कांबळे - द्वितीय क्रमांक (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय क्रमांक (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा) यांनी यश संपादन केले. ज्युनियर कॉलेज गटात वक्तृत्व स्पर्धा : श्रेया इंदुरकर प्रथम, वेदिका मोरे द्वितीय, सुगम गायन स्पर्धा : नारायण साई प्रथम, टॅलेंट सर्च स्पर्धा : श्रावणी सांगळे प्रथम, चित्रकला : सायमा गोलंदाज द्वितीय क्रमांक संपादन केला. या स्पर्धेच्या शाखास्तरीय फेरीत निवड झालेल्या विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांनी विभागीय स्तरावरही उत्कृष्ट कामगिरी दाखवली.

प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. कैलास पाटील, डॉ. अस्मिता तपासे, डॉ. समीक्षा फराकटे, डॉ. संजय अंकुशराव, डॉ. सुमय्या इनामदार, डॉ. प्रदीप पाटील, प्रा.सतीश उपळावीकर यांनी स्पर्धेचे नियोजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी सर्व यशस्वी स्पर्धक, समन्वयक व सहभागी शिक्षकांचे अभिनंदन केले.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमधील कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर** : विवेकानंद कॉलेज, भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने जिओ फेस्ट या दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी भूगोल विषयातील ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन गटांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्याचदिवशी सायंकाळी हौशी खगोल अभ्यासक अनिल गवळी यांचे व्याख्यान झाले. आकाश निरीक्षण कार्यक्रमास प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. संजय थोरात व डॉ. श्रुती जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

पुण्य नगरी

बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या वार्षिक नियतकालिक स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये विवेकानंद कॉलेजच्या विवेक वार्षिक नियतकालिकाने बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात मोठी भर पडली असून, महाविद्यालयाने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध साहित्य प्रकारात १५ पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी संपादक मंडळ व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

पुढारी बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजचे विविध स्पर्धांमध्ये यश

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्ताने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धेच्या विभागीयस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षकांनी यश संपादन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जुना बुधवार पेठ येथे विभागीय स्पर्धा पार पडली. महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वितांमध्ये अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय (कराओके स्पर्धा) यात यश संपादन केले. गुरुदेव कार्यकर्ता गटातील सागर कांबळे - द्वितीय (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय (वक्तृत्व स्पर्धा) यामध्ये यश मिळवले.

पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय विवेकानंद महोत्सवाचे १६ फेब्रुवारीपासून आयोजन

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने १६ व १७ फेब्रुवारी दरम्यान 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमामध्ये पहिल्या दिवसी अभिवाचन, आयडीयाथॉन, रील फ्लिक्स, डान्स मॅजिक स्पर्धा होणार आहेत. स्पर्धांसाठी रोख पारितोषिके विजेत्यांना मिळणार आहेत. दुसऱ्या दिवसी दि. १७ फेब्रुवारी रोजी विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर ॲण्ड मिस विवेकानंद स्पर्धा होईल. तसेच, आजी-माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कलाकौशल्यास वाव देण्यासाठी स्टुडंटस् एक्स्पो होणार आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आय.क्यु.ए.सी. व महोत्स्वाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.

तरुण भारत संवाद

शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

# कृषी उपसंचालकपदी पल्लवी पाटील यांची नियुक्ती



कोल्हापूर : पल्लवी संपतराव पाटील यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले आहे. कृषी विभागातील परीक्षेत त्यांनी राज्यात आठवा क्रमांक मिळवला आहे. त्यांची कृषी उपसंचालक पदावर नुकतीच नियुक्ती झाली आहे. येथील नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे निवृत्त शिक्षक एस. ए. पाटील यांची पल्लवी पाटील कन्या आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू विद्यालय न्यू पॅलेस येथे झाले. अकरावी, बारावीपर्यंतचे शिक्षण विवेकानंद कॉलेज येथे झाले. बी.एस्सी. ॲग्रिकल्चर तळंदगे येथील डी. वाय. पाटील कॉलेज येथे पूर्ण झाले आहे. त्यांचे उच्च शिक्षण ॲग्रिकल्चर एम.एस्सी. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे पूर्ण झाले. त्यांनी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून ॲग्रिकल्चर क्लास वन अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे.

सकाळ TODAY

कोल्हापूर, शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

# पल्लवी पाटील राज्यात आठवी



पल्लवी पाटील

वारणानगर : कोल्हापूर येथील पल्लवी संपतराव पाटील हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेत राज्यात आठवा क्रमांक पटकाविला. राज्य शासनाच्या कृषी उपसंचालक या पदावर निवड झाली आहे. प्राथमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू विद्यालय न्यू पॅलेस, बारावीपर्यंत विवेकानंद कॉलेज, बीएससी ॲग्रीकल्चर कॉलेज हे शिक्षण डी. वाय. पाटील कॉलेज तळसंदे (ता. हातकणंगले), एमएससी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे झाले. नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे निवृत्त शिक्षक एस. ए. पाटील व आई, भाऊ, शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक महासत्ता इचलकरंजी

रविवार, ता.१५ फेब्रुवारी २०२६

# पल्लवी पाटील हिची निवड

वारणानगर,ता.१४(प्रतिनिधी)-

कोल्हापूर येथील पल्लवी संपतराव पाटील हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत राज्यात आठवा क्रमांक मिळविला.या यशामुळे तिची राज्य शासनाच्या कृषी उपसंचालक या पदावर नुकतीच निवड झाली आहे



तिचे प्राथमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू विद्यालय न्यू पॅलेस,महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे तर बीएससी ॲग्रीकल्चरचे शिक्षण डी.वाय.पाटील कॉलेज तळसंदे (ता.हातकणंगले) येथे पूर्ण झाले आहे.त्याचबरोबर उच्च शिक्षण ॲग्रीकल्चर एमएससी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे पूर्ण झाले.तिला आई-वडील,भाऊ तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

पुढारी | ४
सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६

# राष्ट्रीय विवेकानंद महोत्सव आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात दि. १६ व १७ फेब्रवारी रोजी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमामध्ये अभिवाचन, आयडीयाथॉन, रील फ्लिक्स, डान्स मॅजिक स्पर्धा होणार आहेत. स्पर्धांसाठी रोख पारितोषिके विजेत्यांना मिळणार आहेत. विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर ॲण्ड मिस विवेकानंद स्पर्धा होईल. तसेच आजी -माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कलाकौशल्यास वाव देण्यासाठी स्टुडंटस् एक्स्पो होणार आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६

# विशेष संख्याशास्त्रीय सादरीकरणात 'विवेकानंद', 'वसंतरावदादा'चे यश

कोल्हापूर, ता. १६ : दैनंदिन जीवनातील वास्तव समस्यांवर संख्याशास्त्र उपयुक्त ठरू शकते, याची प्रचिती देणाऱ्या विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेमध्ये कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटनेने 'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' विषयावर कार्यशाळा घेतली. विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या परिसरातील प्रतिव्यक्ती मासिक वाहन इंधन वापराचा अंदाज' विषयावर स्पर्धा झाली.

स्पर्धेत दहा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. प्रथम फेरीतून एल. बी. एस. महाविद्यालय (सातारा), पी. डी. व्ही. पी. महाविद्यालय (तासगाव), पी.व्ही. पी. महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि एस. जी. एम. महाविद्यालय (कऱ्हाड) यांचे संघ अंतिम फेरीसाठी पात्र झाले. विवेकानंद महाविद्यालयाने द्वितीय आणि सद्गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालयाने (कऱ्हाड) तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून डॉ. शशिभूषण महाडिक, गणेश खटावकर यांनी काम पाहिले. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. महाडिक आणि डॉ. सोमनाथ पवार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शेजारी डॉ. अनिल गोरे, शशिभूषण महाडिक, गणेश खटावकर आदी.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६

# ‘विवेकानंद’मधील नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना व नंदादीप नेत्रालय कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. यास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांचा प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या हस्ते झाले. डोळ्यांची कशी काळजी घ्यावी, याविषयी रवींद्र मोहिते, शोभना परब, शुभदीप मोंडल, सुयश निकम, सुधीर शिंगे यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. पी. आर. बागडे यांनी केले. यावेळी डॉ. कविता तिवडे, डॉ. ए. एस. महात, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. डी. आर. तुपे, प्रा. एच. व्ही. चामे उपस्थित होते.

12/26

पुण्य नगरी ■ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६

# शहरात जयघोष

**कोल्हापूर :** शिवजयंतीनिमित्त शहरात विविध संस्था, संघटना, कार्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला.

**विवेकानंद कॉलेज :** विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीप्रसंगी डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. पन्हाळा येथे आयोजित पदयात्रेमध्ये एनएसएस स्वयंसेवक व एनसीसी विभागातील छात्र, तसेच प्रा. कॅप्टन सुनीता भोसले व डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. इतिहास विभागातील डॉ. अनिल जांभळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अश्विनी खवळे यांनी आभार मानले.

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६

# श्रीशैल मिस्टर विवेकानंद, तर आर्या मिस विवेकानंद




कोल्हापूर : विवेकानंद महोत्सवात मिस्टर विवेकानंद श्रीशैल शिंदे, मिस विवेकानंद म्हणून आर्या काटकर यांनी विजेतेपद पटकावले.

कोल्हापूर, ता. २४ : स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कलाकौशल्यांना प्रोत्साहन देण्याचे काम विवेकानंद कॉलेज करीत आहे. स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थी नावलौकिक मिळवतील, असे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी सांगितले. ते विवेकानंद महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

श्रीशैल शिंदे याची मिस्टर विवेकानंद म्हणून, तर आर्या काटकर हिची मिस विवेकानंद म्हणून निवड झाली. महोत्सवात स्टुडंटस् एक्स्पो हा उपक्रम झाला. महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह भोसले, सप्रे इंडस्ट्रीजच्या संचालक रेणुका सप्रे यांनी भेट दिली. महाविद्यालयातील ऑस्ट्रेलिया व आफ्रिकेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या देशाची संस्कृती व हस्तकलांचे प्रदर्शन मांडले होते. जितेंद्र देशपांडे, प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. उमाकांत पाटील, डॉ. अजय आंभोरे, वैभव चव्हाण, नेहा भस्मे, विष्णू वजार्डे, गीतांजली ठोमके, संग्राम भालकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. डॉ. विकास जाधव, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, संजय दळवी उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी प्रास्ताविक केले.

पुढारी बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६

# 'मानसिक व सामाजिक आरोग्य महत्त्वाचे'

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैली अंगीकारावी. आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे तर शारीरिक-मानसिक पूर्णपणे सुस्थितीत असणे गरजेचे आहे, असे मत सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. कल्पना कांबळे यांनी व्यक्त केले. विवेकानंद ज्युनिअर कॉलेज स्क्वॉफ अंतर्गत आयोजित कार्यक्रमात उद्घाटनाच्या प्रसंगी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात होते. प्रा.शिल्पा भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेजच्या वतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. प्रा.गीतांजली साळुंखे, प्रा.बी.एस.कोळी, प्रा. एम. आर. नवले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. प्रा. अश्विनी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. उत्तम तिजाईकर यांनी आभार मानले.

126

25-2-2026

पुण्य नगरी
कोल्हापूर। गुरूवार,२६ फेब्रुवारी २०२६



# साहित्याकडे डोळसपणे पाहा

## प्रा. शिंदे; 'विवेकानंद'मध्ये युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा साहित्य संमेलन घेणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव महाविद्यालय आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लिहिलेली दैनंदिनी प्रमाण मानून विद्यार्थ्यांनीही दैनंदिनी लिहिली पाहिजे आणि हीच साहित्य लेखनाची सुरुवात असते. मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. साहित्याकडे डोळसपणे पाहण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व समीक्षक प्रा. रणधीर शिंदे यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षीय मनोगतात कौस्तुभ गावडे म्हणाले, कोल्हापूर नगरीने महाराष्ट्राला अनेक साहित्यरत्ने दिली आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हेसुद्धा साहित्यिक होते. बापूजींनी लिहिलेल्या प्रार्थनेतून मानवतावादी विचार प्रकट होतात.

संमेलनाच्या प्रथम सत्रात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक किरण गुरव यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. प्रा. सतीश उपळावीकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. इरफान मुजावर यांनी कविता सादर केल्या.

संमेलनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसर ते ग्रंथालय या मार्गावरील ग्रंथदिंडीने टाळ व मृदंगाच्या गजरात झाली. प्रास्ताविक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. अविनाश गायकवाड व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी केले. संमेलनाचे आयोजन डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे, डॉ. शुभांगी काळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. ए. एस. महात, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. सनी काळे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी केले.

26/2/26

सकाळ TODAY

कोल्हापूर, गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६

# मातृभाषा विकासासाठी वाचन, लेखन हवे

## प्रा. डॉ. रणधीर शिंदे : 'विवेकानंद'मध्ये आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेत व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे. मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेत विकसित होते. साहित्याकडे डोळसपणे पाहण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे,' असे प्रतिपादन लेखक व समिक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ व 'आयक्युएसी' यांच्यातर्फे पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, 'आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा साहित्य संमेलन घेणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव महाविद्यालय आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य, नातेसंबंध, व्यावसायिक मूल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक योगदान यावर विद्यार्थ्यांनी गंभीर विचार करण्याची आवश्यकता आहे.




कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनात बोलताना प्रा. रणधीर शिंदे. सोबत कौस्तुभ गावडे व इतर मान्यवर.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लिहिलेली दैनंदिनी प्रमाण मानून विद्यार्थ्यांनीही दैनंदिनी लिहिली पाहिजे आणि हीच साहित्य लेखनाची सुरुवात असते.'' संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाचे आयोजन केले होते. प्रथम सत्रात किरण गुरव यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात कवी विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. प्रा. सतीश उपळावीकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. इरफान मुजावर यांनी कविता सादर केल्या. संमेलनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसर ते ग्रंथालय या मार्गावरील ग्रंथदिंडीने टाळ व मृदंगाच्या गजरात झाली. समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. अविनाश गायकवाड व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी सूत्रसंचालन केले. स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी श्रावणी पाटील हिने मनोगत व्यक्त केले. डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे, डॉ. शुभांगी काळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. ए. एस. महात, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. सनी काळे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी संयोजन केले.

### नवोदितांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, ''धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभे करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते.'

सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार,
२६ फेब्रुवारी २०२६/३

# आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत श्रेया बराले प्रथम



श्रेया बराले

**वडणगे :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी (बी.ए - भाग ३) श्रेया विश्वास बराले (रा. वडणगे) हिने ४६ किलोखालील वजनीगटात प्रथम क्रमांक मिळविला. तिची ओडिशा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धा साळोखेनगर येथील डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये पार पडल्या. श्रेयाला प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. संतोष कुंडले, अर्चना बराले आदींचे मार्गदर्शन लाभले.